प्रवेशाकरिता महाविद्यालयस्तरावर तपासावयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

अ. क्र.	प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील	आहे (✓) / नाही (×)
(१)	**(अ) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला / नेटिव्हीटी सर्टिफिकेट (राज्या बाहेरील उमेदवारांबाबत)**	
	(ब) इतर राज्यातील उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / रहिवास व जन्मदाखला.	
(२)	MHT-CET / JEE / NEET सामायिक प्रवेश परीक्षेचे गुणपत्रक / गुणपत्रके	
(३)	**उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेचे प्रमाणपत्र** (एच्एस्एस्सी- इ.१२ वी) **गुणपत्रक** किंवा गुणविवरणपत्र. (**गुणपत्रकामध्ये टक्केवारी नमूद नसल्यास, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने गुणपत्रकातील टक्केवारीचे पत्र.**)	
(४)	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एस्एस्सी- इ.१० वी) गुणपत्रक किंवा गुणविवरणपत्र. (**गुणपत्रकामध्ये टक्केवारी नमूद नसल्यास, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीने गुणपत्रकातील टक्केवारीचे पत्र.**)	
(५)	(अ) **महाविद्यालय सोडल्याचे / महाविद्यालय बदलीचे प्रमाणपत्र** (शेवटी शिकत असलेल्या) किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड** प्रमाणपत्र.	
	(ब) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांसंदर्भात, चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या **संबंधित महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.**	
(६)	अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र. (विशेष मागास प्रवर्गातील उमेदवार यापूर्वी इतर प्रवर्गात असल्यास त्या प्रवर्गाचे सुध्दा जात प्रमाणपत्र.)	
(७)	अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे **जात वैधता प्रमाणपत्र**	
(८)	विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड, इतर मागासवर्गीय जाती, विशेष मागास मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील उमेदवारांसाठी दिनांक ३१ मार्च,२०२७ पर्यंत ग्राह्य असलेले सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र	
(९)	खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या पात्रतेसाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/ प्र.क्र.३१ /१६-अ, **दि.३१/५/२०२१** अनुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे चालू शैक्षणिक वर्षासाठी ग्राह्य असलेले प्रमाणपत्र.	

अ. क्र.	प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील	आहे (✓) / नाही (×)
(१०)	(अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.**	
	(ब) **'उमेदवार** स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी आहे' **अशा आशयाचे स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती / पत्नीचे रु.१०/- चा कोर्ट फी स्टॅम्प चिकटवलेल्या साध्या कागदावर प्रतिज्ञापत्र.** सदर प्रतिज्ञापत्राची नोंद शासन दप्तरी असण्याच्या दृष्टिकोनातून प्रतिज्ञापत्रावर शासनमान्य व्यक्तीची (उदा. स्टॅम्प व्हेंडर, कार्यकारी दंडाधिकारी इत्यादी) स्वाक्षरी, शिक्का व नोंद क्रमांक, दिनांक असावे.	
(११)	**संरक्षण दलातील कर्मचारी** असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र** किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. (**केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार परिशिष्ट 'डी' मध्ये नमूद केलेले प्राधान्यक्रम प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेले असावे.**)	
(१२)	सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक दिव्यांगाचे प्रमाणपत्र.'** **[विकलांगतेची टक्केवारी** शारिरीकदृष्टया दिव्यांग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्याच्या बाबतीत, **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.** तथापि, भारताचे राजपत्र दि.१४/०५/२०१९ मध्ये दिलेल्या नियमावलीतील विकलांगतेच्या कमाल टक्केवारीचे निकष लागू असतील.**]**	
(१३)	लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने / किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.**	
(१४)	उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील **सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ किंवा चालू वर्षातील 'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.**	

अ. क्र.	प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील	आहे (✓) / नाही (×)
(१५)	(i) विद्यार्थी / विद्यार्थीनीच्या नावे किंवा माता-पिता / आजोबा-आजीच्या नावे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ वर्षाचे गाव अधिकार अभिलेखे (७/१२ उतारा / खसरा).** सदर उतारा **प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वीच्या मागील तीन महिन्यांच्या पूर्वी** (म्हणजेच दि.१० एप्रिल,२०२६ पूर्वी) डाऊनलोड केलेला **नसावा.** (ii) आई / वडील हयात नसल्यास त्याच्या कुटुंब प्रमुख्याच्या नावावरील **अधिकार अभिलेखे (७/१२ उतारा)** व कुटुंब प्रमुखाचे **रु.१०/- चा कोर्ट फी स्टॅम्प चिकटवलेल्या साध्या कागदावर प्रतिज्ञापत्र.** सदर प्रतिज्ञापत्राची नोंद शासन दप्तरी असण्याच्या दृष्टिकोनातून प्रतिज्ञापत्रावर शासनमान्य व्यक्तीची (उदा. स्टॅम्प व्हेंडर, कार्यकारी दंडाधिकारी इत्यादी) स्वाक्षरी, शिक्का व नोंद क्रमांक, दिनांक असावे. **(iii) हा उतारा मराठी/ हिंदी किंवा इंग्रजी भाषेमध्ये नसल्यास, प्रमाणित अनुवादाची प्रत सोबत जोडावी.** (iv) उमेदवाराच्या आईच्या वडिलोपार्जित शेतजमिनीमध्ये तीचा हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे **रु.१०/- चा कोर्ट फी स्टॅम्प चिकटवलेल्या साध्या कागदावर** केलेले शपथपत्र. सदर प्रतिज्ञापत्राची नोंद शासन दप्तरी असण्याच्या दृष्टिकोनातून प्रतिज्ञापत्रावर शासनमान्य व्यक्तीची (उदा. स्टॅम्प व्हेंडर, कार्यकारी दंडाधिकारी इत्यादी) स्वाक्षरी, शिक्का व नोंद क्रमांक, दिनांक असावे. (v) डिजीटल स्वाक्षरीत डेटाबेस आधारीत संगणकीकृत अधिकार अभिलेखे (७/१२ उतारा) नसल्यास त्यावर तलाठी / सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी अनिवार्य आहे.	
(१६)	उमेदवाराच्या माता / पित्याचे उपजिविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे **सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ किंवा चालू वर्षातील** तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **'भूमिहीन शेतमजुराचे प्रमाणपत्र'** (असे प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे नसावे.) तथापि, **अशा उमेदवारास 'शेतकरी' (एजी) प्रवर्ग लागू असणार नाही.**	
(१७)	मत्स्य व्यवसाय करणाऱ्या कुटुंबासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे सहायक मत्स्य आयुक्तांचा मासेमार दाखला.	
(१८)	**राष्ट्रीय छात्रसेने**चे (एनसीसी) **'ब' किंवा 'क' प्रमाणपत्र** किंवा समादेशक अधिकाऱ्याचे (वायु /नौसेना / सैन्यदल) (अकरावी किंवा बारावी इयत्तेमध्ये उत्तीर्ण झालेले).	
(१९)	उमेदवाराने महाविद्यालयात इयत्ता **अकरावी आणि / किंवा बारावी मध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.**	
(२०)	कनिष्ठ महाविद्यालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे **'एनएसएस (राष्ट्रीय सेवा योजना) प्रमाणपत्र'.** (किमान २४० तास काम केलेले / विशेष शिबीर केलेले).	

अ. क्र.	प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील	आहे (√) / नाही (×)
(२१)	**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद / कृषी विद्यापीठ यांच्या कर्मचाऱ्यांचा पाल्य असल्याचे प्रमाणपत्र.**	
(२२)	इ.११ / १२ वी मध्ये जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय वादविवाद/ निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धांमध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेले जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे प्रमाणपत्र.	
(२३)	कृषीविज्ञान किंवा ग्रामीण संस्था, अमरावती किंवा वर्धा येथील **पदविका गुणपत्रक / प्रमाणपत्र.**	
(२४)	कृषी तंत्र शाळेतील गुणपत्रक / प्रमाणपत्र.	
(२५)	जम्मू व काश्मीर राज्यातील **स्थलांतरित / विस्थापित विद्यार्थी,** शासन निर्णय क्र.एजीयु-२०९५/ २३१०६/ सीआर-१८१/१९-अे, दि. ५/९/१९९६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र**. विस्थापिता संबंधीचे शपथपत्र विचारात घेतले जाणार नाही.	
(२६)	सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **'ना हरकत प्रमाणपत्र'.**	
(२७)	स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट 'एच'** मधील हमीपत्र.	
(२८)	संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत **परिशिष्ट 'एफ'** मधील स्वयंघोषणा पत्र.	
(२९)	महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि. २३/८/२०२१ अन्वये विभागीय उपायुक्त (महिला व बालविकास) यांच्या छापील लेटर हेडवरील विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्वाक्षरीचे विहित नमुन्यातील (''अ'' / ''ब'' / ''क'' प्रवर्गातील) अनाथ प्रमाणपत्र.	
(३०)	अल्पसंख्यांक कोटयातून प्रवेशासाठी अल्पसंख्यांक उमेदवाराचे धार्मिक / भाषिक स्वयंघोषणा प्रमाणपत्र. (**परिशिष्ट- 'ई'**)	